आवक क्रं कविछ्कर
आ.प्र./२८/२०२१/२०२२
दि.- ८/०४/२०२१

# द्वितीय फेर जाहीर दरपत्रक

यान्द्वारे कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘एफ’धानिव/ पेल्हार कार्यक्षेत्रातील खालील यादीतील नमुद तलाव सन २०२१ ते सन २०२४ या तीन वर्षाकरीता ठेका पध्दतीने मत्स्य संवर्धनाकरीता देणे करीता दरपत्रक मागविणे कामी जाहीर दरपत्रक सुचना दि. ०९/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजले पासुन ते दि. २२/०४/२०२१ रोजी सांय. ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या vvcmc.in या संकेत स्थळावर तसेच प्रभाग समिती ‘एफ’धानिव/पेलहार कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येते आहे. इच्छूक दरपत्रक धारकानी सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि. २२/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती ‘एफ’ धानिव-पेल्हार कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात सादर करावे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम | ठेकेदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | चांदिप, मोठा तलाव | ११,१०४/- | |
| २. | चांदिप,लहान तलाव | ६,३७१/- | |
| ३. | कशिद –कोपर, तलाव | १७,११३/- | |
| ४. | शिरसाड, गांव तलाव | ६,११८/- | |
| ५. | शिरसाड, धारावी तलाव | ३३,३१४/- | |
| ६. | शिरसाड,नाना सामंत तलाव | ३८,९५९/- | |
| ७. | पेल्हार वाकणपाडा तलाव | ३७,५०२/- | |
| ८. | धानिव बाग तलाव | ६६,४४७/- | |

१. दरपत्रक धारकाने महानगरपालिकेची कोणत्याही विभागाची (कर विभाग, पाणीपट्टी विभाग तसेच वरील प्रकारच्या यापुर्वीचे निविदेतील कोणतीही थकबाकी) नसलेबाबतचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे.
२. सदर विषयी दरपत्रक कोटेशन फॉर्म नमुना वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘एफ’ कार्यालयातुन दि.०९/०४/२०२१ ते दि. २२/०४/२०२१ पर्यत कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावा.
३. दरपत्रक धारकाने दरपत्रकातील दर भरतांना १८% जी.एस.टी. करासहीत दर भरावयाचे आहेत.
४. दरपत्रक धारकाचे पॅनकॉर्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.
५. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती ‘एफ’धानिव/पेल्हार येथील आवक-जावक विभागात सादर करणे बंधकारक राहील.
६. दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून रु. १०० चे करारपत्रावर करारनामा लिहून द्यावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
७. दरपत्रकातील दर सादर करताना सर्व करासहित दर्शविण्यात यावे.
८. मुदतीत प्राप्त झालेली दर पत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेस राहील.
९. वरील अटींचे पालन जे दरपत्रक धारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविणेत येतील.
१०. वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफ्यात दि. ०९/०४/२०२१ ते दि. २२/०४/२०२१ या दिवसापर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती ‘एफ’धानिव/पेल्हार येथे सादर करावीत.
११. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. २३/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता अथवा तद्नंतर सोयीनुसार मा. सहा. आयुक्त आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रक धारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

(मोहन संखे)
प्र. सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती ‘एफ’धानिव/पेल्हार
वसई-विरार शहर महानगरपालिका

*G:\NIYATI\Nilesh Mhatre Sir\Talav\Talav Yadi.Docx*